Impact Factor - 8.572 (SJIF)
ISSN - 2278 -9308

FEBRUARY 2022
ISSUE NO. (CCCXXXVI) 336

# B.Aadhar

Peer - Reviewed & Refereed Indexed

MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL RESEARCH JOURNAL



एकदिवसीय आंतरराष्ट्रीय चर्चासत्र

## मराठी साहित्यातील नवजाणिवा

शोधनिबंध विशेषांक

संपादक

डॉ. जगदीश साबू | डॉ.शिवाजी नागरे | डॉ.श्रीकृष्ण काकडे

This Journal is Indexed in

Scientific Journal Impact Factor (SJIF)
Cosmos Impact Factor (CIF)
International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit to : www.aadharsocial.com

Aadhar PUBLICATIONS

**Impact Factor – 7.675** **ISSN – 2278-9308**

# B.Aadhar

## Peer-Reviewed & Refereed Indexed

### Multidisciplinary International Research Journal

**February,2022**

**ISSUE No- (CCCXXXVI ) 336**

# मराठी साहित्यातील नवजाणिवा

**Prof. Virag.S.Gawande**
Chief Editor
Director
Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.

प्रा.डॉ. शिवाजी नागरे
प्रा. डॉ. श्रीकृष्ण काकडे
संपादक
मराठी विभाग,
शंकरलाल खंडेलवाल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय अकोला.

**Aadhar International Publication**

For Details Visit To : www.aadharsocial.com

© **All rights reserved with the authors & publisher**

ISSN : 2278-9308
February, 2022


| | | |
|---|---|---|
| 78 | एकविसाव्या शतकातील मराठी स्त्रीकथेतील स्त्रीभान डॉ.सीमा मुसळे | 355 |
| 79 | २१ व्या शतकातील मराठी कादंबरीतील नवजाणीवा प्रा. डॉ. केशव सिताराम गोरे | 362 |
| ✓80 | अंजनाबाई खुणे यांच्या कवितेतील नवजाणिवा प्रा. रमेश एम. धोटे | 365 |
| 81 | एकविसाव्या शतकातील मराठी कथा प्रा. डॉ. किरण प्रभाकर वाघमारे | 368 |
| 82 | भाषिक व सांस्कृतिक बदलांचा साहित्यातील आविष्कार प्रशांत अशोकराव घुगे | 374 |
| 83 | शरद जोशी यांचे कार्य आजही प्रेरणादायी **Shubham Rameshwar Gawande** | 376 |
| 84 | Reflection of dystopia and lockdown in contemporary marathi literature **Asst. Prof. Dimple d. Mapari** | 380 |
| 85 | समकालीन मराठी साहित्यात विज्ञान साहित्याचे योगदान डॉ. सुदर्शन दिवसे | 387 |
| 86 | आदिवासी लोकगीतातील नव्या जाणिवा डॉ. मंदा माणिकराव नांदुरकर | 393 |

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.572 Issue NO, 336 (CCCXXXVI)
ISSN : 2278-9308 February, 2022

# अंजनाबाई खुणे यांच्या कवितेतील नवजाणिवा

प्रा. रमेश एम. धोटे
आदर्श महाविद्यालय देसाईगंज जि. गडचिरोली

''मराठी साहित्यातील नवजाणिवा'' या विषयावर एकदिवसीय आंतरराष्ट्रीय चर्चासत्राच्या आयोजनानिमित्य एकविसाच्या शतकात भारतीय समाज जीनवात अभूतपूर्व बदल घडून येत आहेत. जागतिकीकरण, माहिती तंत्रज्ञान, शहरीकरणाचा प्रभाव, जनमासावर अधिक प्रमाणात पडलेला आहे. त्यामुळे मराठीतील ग्रामीण, दलित, आदिवासी तसेच स्त्रीवादी साहित्यांचे प्रवाह अनेक स्थित्यंतरातून मार्गक्रमण करीत आहेत. पाश्चिमात्य संस्कृती, वसाहतवाद, प्रादेशिक जीवन जाणिवा अधिक तीव्र होत आहेत. नवतंत्रज्ञानामुळे समाज भाषा व संस्कृती पूर्वीपेक्षा अधिक अधिक वेगाने बदलत आहे. या पार्श्वभूमिवर मराठी साहित्यात अनेक स्तरावर बदलाची प्रक्रिया सुरु झालेली आहे. कथा, कादंबरी, काव्य, नाटय, ललीत व समीक्षा इ. साहित्य प्रकारात त्याचे दर्शन अधिक प्रभावीपणे दिसून येत आहे. त्या अनुषंगाने मराठी काव्यक्षेत्रात अंजनाबाई खुणे यांच्या काव्यातील बदलती स्थिती, गती, स्थित्यंतरे, आणि त्यांची प्रतिक्रिया या संबंधी प्रस्तुत शोध निबंध.

**प्रस्तावना** — सौ. अंजना श्रीराम खुणे हया वडेगांव (रेल्वे) येथील आहेत. त्यांचा जन्म ८ डिसेंबर १९४० रोजी बुधेवाडा जि. गोंदिया येथे त्यांनी आपल्या काव्यलेखनाला प्रारंभ केला. वयाच्या साठाव्या वर्षी जांभळी (साकोली) येथील ७ व्या झाडीबोली संम्मेलनात त्यांच्या बोली संग्रहात 'अंजनाबाईची कविता' प्रकाशित झाली. त्यांना त्यांच्या कविता तोंडपाठ असत. सामाजिक विषयावर कविता सादर करण्याची त्यांची पध्दत आहे. त्यांना डॉ. हरिश्चंद्र बोरकर यांनी 'झाडीपट्टीची बहिणाबाई' म्हणून गौरविले आहे.[१] सौ. अंजनाबाईची कविता 'उगवतीचे रंग' या पुस्तकात आली आहेत. त्यांना बेळगाव (कर्नाटक) येथे अ.भा. मराठी साहित्य संम्मेलनात आपल्या कविता वाचण्याची संधी मिळाली. 'उगवतीचे रंग' नावाने अंजनाबाई खुणे सोबत चौदा कविंचा प्रतिनिधिक कविता संग्रह इंदौर येथे अ.भा.म. साहित्य संम्मेलन प्रसंगी प्रकाशित झाला. या संग्रहाचे संपादक निरंजन उजगरे यांनी केले.

विदर्भातील बहिणाबाई असा त्यांचा गौरव केल्या जातो. अंजनाबाईचे शिक्षण प्राथमिक ४ थ्या वर्गापर्यंत, झाडीपट्टीतील प्रतिभाशाली कवियीत्री 'अंजनाबाईची कविता', 'अंजनाबाईची गाणी' म्हणून काव्यसंग्रह प्रसिध्द आहेत. त्यांच्या कवितेतून जीवनानुभव जाणवत असून त्यात स्त्रीजन्म, तिचे दाम्पत्य, कन्या वियोग, गृहजीवन, सणवार, माहेरवाशीण या सोबतच समाजाचे व झाडीपट्टीतील संस्कृतिचेही दर्शन घडते. मराठी साहित्य संम्मेलनात, आकाशवाणी, दूरदर्शन व झाडीबोली साहित्य संम्मेलनातून सातत्याने अंजनाबईंनी आपल्या कवितांचे वाचन केले. त्यांना महाराष्ट्र शासनाच्या समाज कल्याण विभागाचा व्यसनमुक्ती पुरस्कार (२००२) व इतर अनेक पुरस्कार मिळाले. विदर्भातील काव्यप्रवाहात अंजनाबाई खुणे काव्यलेखनात आपल्या मनाचा हळुवारपणा जपत आपल्या भावना उजागर करतात हे त्यांच्या काव्याचे निराळेपण आहे.[२]

पूर्व विदर्भात झाडीपट्टीला अनन्य साधारण महत्व आहे. येथील संस्कृती, रुढी, परंपरा, सण उत्सव, बोलीभाषा यांना वेगळे अस्तित्व आहे. येथे कथा, कविता, नाटक, म्हणी, उखाणे, यावर विस्तृत साहित्य निर्माण होत आहेत. मराठी भाषेत झाडी बोलीला विशेष स्थान आहे. झाडीपट्टी चे काव्य म्हणजे शाब्दिक सौंदर्यच म्हणावे लागेल. या क्षेत्रात सौ. अंजनाबाई खुणे यांच्या कवितेने एक ठसा उमटविला आहे. 'अंजनाबाईची कविता' या पहिल्याच काव्यसंग्रहाने त्यांना प्रसिध्दी